यशकथा : मृणालिनी ठिपसे

# सेवा व्यवसाय : ज्येष्ठांचे सहजीवन फुलवण्याचा

लीड : पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांत आज अनेक ज्येष्ठ नागरिक असे आहेत की जे खाजगी कंपन्यांमध्ये उच्च पदावरुन अथवा सरकारी अधिकारी म्हणून निवृत्त झालेले आहेत. काही जण यशस्वीपणे उद्योग करुन आता त्यातून बाजूला झालेले आहेत. ज्येष्ठांमधील अशा वर्गाच्या हातात चांगल्यापैकी पैसा आहे. पण आर्थिक दृष्ट्या सक्षम असले तरीही जोडीदार गमावलेल्या ज्येष्ठांना एकाकीपणा सतावू लागतो. अनेकवेळा कुटुंबात राहूनही त्यांच्या भावनिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. नेमकी हीच बाब ओळखून माधव दामले यांनी ज्येष्ठांसाठी अनेक उपक्रम सुरु केले. त्यातून अशा एकाकी पडलेल्या ज्येष्ठांना आनंदाने आयुष्य घालवण्याचे मार्ग मिळत आहेत तर दामले यांना त्यातून उत्पन्नाचं साधन मिळालेलं आहे. त्यांच्या याच उद्योगाबद्दल वाचू या खालील लेखात...

'एकाकी पणाला कंटाळून ज्येष्ठाची आत्महत्या','दाराच्या बाहेर दोन, तीन दिवसाच्या दुधाच्या पिशव्या बघून शेजाऱ्यांनी सदनिकेचं दार तोडलं असता घरात एकटं राहणाऱ्या ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याचं समोर आलं'. एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठांसंबंधीच्या अशा काहींना काही बातम्या समाज माध्यमांद्वारे वरचेवर आपल्यापर्यंत पोहचत असतात. त्या क्षणाला त्या ज्येष्ठासाठी आपण हळहळतो. त्यांची काळजी न घेणाऱ्या आजच्या तरुण पिढीला बोल लावतो आणि तो विषय तिथेच संपवतो. पण पुण्यातील माधव दामले यांनी आपल्यासाठी संपलेल्या याच विषयापासून सुरुवात करून 'हॅपी सिनियर्स' या व्यावसायिक सेवेअंतर्गत समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम परंतु एकाकी ज्येष्ठांना उतारवयात नवीन साथसोबत मिळवून देण्याचं काम गेल्या सात–आठ वर्षांपासून सुरू केलं आहे. आत्तापर्यंत त्यांनी जुळविलेल्या ज्येष्ठांच्या ५५ जोड्या पुनर्विवाह किंवा लीव्ह इन रिलेशनशिप (लग्न न करता सहजीवन)च्या माध्यमातून एकमेकांच्या साथीने आपले उत्तर आयुष्य अधिक परिपूर्ण रीतीने जगत आहेत. पारंपरिक विवाहसंस्थेच्या गृहितकांना आव्हान देणारा असा हा विचार असला तरी पुणे, मुंबई, सांगली या शहरांमधून त्यांना मिळणारा प्रतिसाद हा समाजातील या व्यावसायिकसेवेची गरज अधोरेखीत करणारा आहे. ज्येष्ठ नागरिकांची गरज ओळखून त्यातून उत्तम अर्थार्जन मिळवून देणाऱ्या या कामाविषयी सविस्तर समजून घेणं श्रेयस्कर ठरेल.

हॅपी सिनियर्स आणखीही काही उपक्रम राबवत असते. त्याविषयी पुढे आपण सविस्तर बोलणारच आहोत. 'वानप्रस्थाश्रम' हा ज्येष्ठांकडून भरभरून प्रतिसाद मिळत असलेला त्यांचा एक उपक्रम आहे. 'वानप्रस्थाश्रम म्हणजे एकत्र कुटुंबात राहणाऱ्या ज्येष्ठांनी किमान काही दिवसांसाठी आपल्या कुटुंबापासून अलिप्त राहून स्वत:साठी जगण्याची, स्वत:चा आनंद शोधण्याची हळूहळू सुरुवात करावी या उद्देशाने आखलेली सहा दिवसांची पॅकेज टूर आहे. या टूरला संपूर्ण महाराष्ट्रातून प्रतिसाद मिळत असून पुढच्या कित्येक महिन्यापर्यंतची त्यांची बुकिंग्ज फुल आहेत. तरुणांचे विवाह जुळविणारे 'वधू –वर पसंती' हे त्यांचे विवाह मंडळही तरुणांमध्ये लोकप्रिय असून आजपर्यन्त या मंडळाच्या माध्यमातून शेकडो विवाह यशस्वीरीत्या ठरवले गेले आहेत. या सर्व सेवा पुरवण्यासाठी पुणे आणि वाई येथे १२ ते १५ जणांचा पूर्णवेळ कर्मचाऱ्यांचा स्टाफ त्यांच्याकडे कार्यरत आहे. तसेच वानप्रस्थाश्रमातील ज्येष्ठांना ज्या दैनंदिन सोयी सुविधा द्याव्या लागतात त्यातूनही अप्रत्यक्षरित्या अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

आधुनिक काळाची गरज म्हणून उदयाला आलेली विभक्त कुटुंबपद्धती, संसार अर्ध्यावर असताना झालेला जोडीदाराचा मृत्यू, नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने मुलांचं बाहेरगावी किंवा परदेशी असणं, स्वतंत्र राहण्याची इच्छा अशा एक ना दोन अनेक कारणांनी मोठ्या शहरांमधून एकेकट्या राहणाऱ्या ज्येष्ठांची संख्या सतत वाढती आहे. एकट्या पुणे शहराचा विचार केला तरी पूर्णत: एकटं राहणाऱ्या ज्येष्ठांची संख्या २५ ते ३० हजारांच्या पुढे आहे. तर २०११ मध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार भारतातील कुटुंबांमधून राहणाऱ्या जोडीदार गमावलेल्या महिलांची संख्या ४.२३ कोटी इतकी आहे.

बऱ्याचदा आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यामुळे भौतिक गरजा भागल्या तरी आपल्या अवतीभवती कोणाचा तरी वावर असावा, दुखल–खुपलं बघायला, आपलं बोलणं ऐकायला कोणीतरी समवयस्क व्यक्ती आपल्याबरोबर असावी याची तीव्र गरज या ज्येष्ठांना वाटत असते. या काळात त्यांची मुलं करिअर, नोकरी–व्यवसाय, त्यांचं स्वत:चं कुटुंब यात गुंतलेली असतात. याचाच परिणाम म्हणून अशा ज्येष्ठांना एकाकीपणाची, नैराश्याची भावना ग्रासून टाकते. नकळतपणे त्याचा परिणाम आपल्या समाज स्वास्थ्यावर होत असतो.

ज्येष्ठांचे पुनर्विवाह ते लीव्ह इन रिलेशनशीप : प्रवाहाविरूद्धचा प्रवास

२०१० साली सेवानिवृत्तीनंतर वाई येथील आपल्या परंपरागत १८० वर्ष जुन्या वाड्याचं नूतनीकरण करायचा निर्णय त्यांनी घेतला. तिथे स्वामी समर्थांचं मंदिर बांधलं. मग एवढ्या मोठ्या वाड्याचं काय करायचं? असा विचार मनात आल्यावर पहिलं उत्तर त्यांच्या डोक्यात आलं ते वृद्धाश्रम ! त्यांनी त्यावेळी सुरू केलेल्या वृद्धाश्रमाची जाहिरात पेपरमध्ये दिली आणि सात–आठ विधुर पुरुष या वृद्धाश्रमात राहायला आले. हे सगळेजण शासनात मोठ्या हुद्द्यावर काम केलेले पेन्शनर लोक होते. त्यांच्यात एक प्रकारचा अहंगंड होता. मुलं, मित्र–मैत्रीणी, नातेवाईक यांपैकी कोणाशीच त्यांचे चांगले संबध नव्हते. सगळे कायम तणावाखाली असायचे. त्यातील एकांनी तर आत्महत्येचा प्रयत्न केला. माधव यांनी शर्थीचे प्रयत्न करून त्यांना वाचवलं. नंतर त्यांच्या मुलांना त्यांना भेटायला बोलावलं. तेव्हा आश्चर्य म्हणजे त्यांच्या मुलांनी यायला नकार दिला . मग माधव यांनी पोलीसांना बोलावू असा दम दिल्यावर ते आले.

माधव म्हणतात हा अनुभव आल्यावर मी विचार करायला लागलो. हल्ली माणसाचं सरासरी वयोमान हे ८० वर्षांपर्यंत पोहोचले आहे. म्हणजे निवृत्तीनंतरची ६० ते ८० ही सुमारे वीस वर्ष या ज्येष्ठांनी कशी काढायची? आम्ही तरुणांसाठी वधू वर सूचक मंडळ चालवत होतोच. मग या ज्येष्ठानाही कोणी जोडीदार मिळवून दिला तर असा विचार माझ्या मनात आला. मग त्यादृष्टीने मी त्यांच्याशी बोलायला लागलो तर त्यांनी मला वेड्यातच काढलं. पण मी त्यांचा पिच्छा सोडला नाही. मग एक जण तयार झाला. पहिलं लग्न आम्ही जमवलं, ते यशस्वी झालं. ते बघून दुसऱ्याही एक जोडीने लग्न केलं पण तिसऱ्या वेळी मात्र त्या पुरुषाच्या मुलाने येऊन गोंधळ घातला व ते लग्न मोडलं. या अनुषंगाने मी विचार करत असताना लीव्ह इन रिलेशनशला कोर्टाने मान्यता दिल्याचं माझ्या वाचनात आलं. आणि मला वाटलं की तरुणांपेक्षाही ज्येष्ठांसाठी ही पद्धत अधिक योग्य आहे. कारण तरुणांना या संबधातून अपत्य झाल्यास त्याची काळजी कोणी घ्यायची याबाबत समस्या निर्माण होऊ शकतात. पण ज्येष्ठांच्या बाबतीत असे प्रश्न येणार नाहीत. असा विचार करून २०१२ साली 'ज्येष्ठ नागरिक लीव्ह इन रिलेशनशिप' मंडळाची स्थापना केली. पहिल्यांदा खूप विरोध झाला. पण प्रवाहाविरूद्ध जाऊन मी काम सुरू ठेवलं. लोकांना यासंदर्भात नक्की काय वाटतं हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार करून ४०० लोकांकडून ती भरून घेतली. त्यातून लक्षात आलं की या वयात लोकांना साथसोबत मिळण्याची गरज आहे. त्यांना हा विचारही योग्य वाटतो. पण हे सगळं पचनी पडायला वेळ लागेल. या कल्पनेचा प्रसार करण्यासाठी मग मी पुणे आणि ठाणे येथे शाखा सुरू केल्या. प्रवाहाच्या विरूद्ध काम असल्याने आमच्या या कामाची समाजमाध्यमांनी मोठ्या प्रमाणावर दखल घेतली त्यामुळे वेगळी जाहिरात वैगेरे करायची आम्हाला गरजच पडली नाही. लोक आपणहून आमच्याकडे सल्ला घ्यायला येऊ लागले.

एखादी ज्येष्ठ व्यक्ती लीव्ह इन किंवा पुनर्विवाहाच्या उद्देशाने जेव्हा 'हॅपी सिनिअर'कडे येते. तेव्हा पुरुषांसाठी पाच हजार आणि महिलांसाठी तीन हजार रुपये भरून संस्थेचं सदस्यत्व तिला दिलं जातं. एखादा जोडीदार आवडल्यावर लीव्ह इन रिलेशनशिप किंवा पुनर्विवाहाचा त्या व्यक्तीचा निर्णय ठाम असेल तर खबरदारी म्हणून त्यासंदर्भातलं करारपत्र झाल्याशिवाय कुठलेही पैशाचे व्यवहार त्यांनी एकमेकांमध्ये करू नयेत अशी सूचना त्यांना दिली जाते. मग पुढील प्रक्रिया केली जाते. यामध्ये दैनंदिन खर्च, औषधपाण्यावरचा खर्च, दोघांचे मालमत्ता विषयक प्रश्न, एकमेकांच्या मुलांशी संबध कसे ठेवायचे, दोघांपैकी एकाला किंवा दोघांनाही आजारपण आल्यास काय करायचं त्याबाबतचे तपशील अशा अनेक गोष्टींचा अंतर्भाव असतो. पुढे एकमेकांबरोबर राहिल्यावर त्यांचे सूर जुळले नाही आणि विभक्त होण्याचा निर्णय त्यांनी घेतला तर कॅन्सलेशन डीड करण्याची सोयही आहे. एरव्ही घटस्फोटासाठी गेलेल्यांचा पैसा, वेळ, वाया जातोच शिवाय

मनस्तापालाही तोंड द्यावे लागते. पण या वयात हा सगळा लढा त्यांना द्यावा लागत नाही त्यामुळे लोकांना ही पद्धत सोयीची वाटते.

सहजीवनासाठी मनोभूमिका घडवणारा फ्रेंडशिप क्लब

बरेच ज्येष्ठ लीव्ह इन किंवा पुनर्विवाहाबाबत ठाम नसतात. लोक काय म्हणतील? आपल्याला हे झेपेल का, आपल्यासारख्या परिस्थितीतील समवयस्कांचे याविषयी काय विचार आहेत याबाबत ते साशंक असतात. अशा लोकांसाठी ‘हॅपी सिनिअर’तर्फे दर महिन्याला एक किंवा दोन दिवसांचं गेटटूगेदर घेतलं जातं. ज्यामध्ये आधीच्या जोड्यांचे अनुभव, यशकथा सांगितल्या जातात. आपल्यासारख्या समवयस्कांबरोबर चर्चा करण्याची संधी त्यांना मिळते. त्यातून आत्मविश्वास वाढला तर जोडीदाराची निवड करून त्यांच्या बरोबर सहजीवन सुरू करण्याचं बळ मिळतं. या गेटटूगेदरचा खर्च घेतला जातो.

वानप्रस्थाश्रम : सुरुवात स्वत:चा आनंद शोधण्याची

कोव्हीडच्या काळात सगळेच ज्येष्ठ लोक घरात अडकून पडले. त्यांना बाहेर पडायची सोय उरली नाही, त्यामुळे अनेक जण वैफल्याची शिकार झाले. त्यांच्यासाठी गेल्या डिसेंबरपासून माधव यांनी वाई येथे वानप्रस्थाश्रम ही योजना काढली. माधव यांच्या वाईच्या वाड्यात या ज्येष्ठांच्या राहण्याची सोय केली जाते. दर सोमवार ते शुक्रवार बारा लोकांना ते पुणे येथून वाईला नेतात. महाबळेश्वर, मेणवली, धोम येथील सहल, बोटिंग गप्पांचे कार्यक्रम, खेळ असा कार्यक्रम असतो. या ज्येष्ठांसाठी जेवण, नाश्त्याची उत्तम सोय केली जाते. दर व्यक्तीमागे त्याचे आठ हजार पाचशे रुपये इतकं शूल्क घेतलं जातं. वाईमधील वेगवेगळ्या स्थानिक महिलांकडून त्यांच्या स्पेशालिटीनुसार हे पदार्थ करून घेतले जातात. असे पदार्थ नियमितपणे या ज्येष्ठांना पुरवणे तसंच या वाड्याचं व्यवस्थापन सांभाळणे यातून अर्थार्जन करण्याची संधी वाईतील अनेक महिलांना उपलब्ध झाली आहे.

वधूवर पसंती

तरुणांचे विवाह जमविण्याचं काम या ऑनलाईन मंडळामार्फत केलं जातं. या स्थळांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी करून घेण्याचं काम गृहिणी घरबसल्या करत आहेत. यासाठी कुठलेही तांत्रिक कौशल्य अवगत करण्याची गरज त्यांना नाही. सद्यस्थितीत अशा दहा महिला हे काम करत असून त्याबदल्यात त्यांना ५०-६० टक्के मानधन त्यांना दिलं जातं.

नियोजित ५० डे केअर सेंटरची योजना

माधव यांचं या क्षेत्रातलं काम बघून शहराच्या वेगवेगळ्या भागात ज्येष्ठांसाठी डे केअर सेंटर सुरू करण्यासाठी अनेक जण त्यांना जागा देण्यासाठी इच्छूक आहेत. नजीकच्या भविष्यात अशी ५० डे केअर सेंटर काढायचा माधव यांचा मानस आहे. कारण शारीरिक, मानसिक, भावनिक स्वास्थ्य चांगले राहिले तरच समाजाची घडी नीट टिकून राहते यावर माधव दामले यांचा विश्वास आहे. समाजातील एखाद्या घटकाच्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक वेळा समाजसेवकांची वाट बघत बसण्यापेक्षा व्यावसायिक स्तरावर आवश्यक सेवा देऊनही यशस्वीरीत्या अशा गरजा भागविता येतात. माधव दामले यांच्या व्यावसायिक सेवांना मिळणारा वाढता प्रतिसाद हे त्याचेच उदाहरण आहे असे आपण म्हणू शकतो.

एकट्या पुण्यातील एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठांची संख्या किती मोठी आहे हे आपण या लेखात वर बघितलंच आहे. इतर शहरांमधूनही कमी अधिक फरकाने हे चित्र असेच आहे. याचाच अर्थ त्या त्या शहरांमधील स्थानिकांना आपल्या शहरातल्या ज्येष्ठांच्या गरजा ओळखून व्यवसाय करण्याच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. अर्थात यासाठी आवश्यकता आहे ती मनात ज्येष्ठांप्रती जिव्हाळा आणि प्रेम असण्याची. तसे झाल्यास आर्थिक उत्पन्नाबरोबर ज्येष्ठांच्या आशीर्वादाचा बोनसही त्यांना मिळाल्याशिवाय राहणार नाही हे नक्की !

चौकट : नोकरी, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात काम करत असताना डोळस आणि संवेदनशील स्वभावामुळे माधव दामले यांना नकळतपणे आपल्या आजूबाजूच्या ज्येष्ठांच्या वाढत्या समस्यांची जाणीव होऊ लागली होती. माधव यांनी यापूर्वी टाटा मोटर्समध्ये सर्व्हिस इंजिनिअर म्हणून काम केलं. त्यानंतर मुळशी येथे स्वत:चा प्रिटिंग प्रेस सुरू केला. टेल्कोची तांत्रिक पुस्तक ते छापून देत असतं. त्यांचा हा व्यवसाय उत्तम रीतीने चालला होता. एक कोटीच्या पुढे त्यांची वार्षिक उलाढाल होती पण पुढे २००९ मध्ये सीडी, व्हीसीडीवर या व्यवसायाचं रूपांतरण झालं. व हा व्यवसाय त्यांनी थांबवला. 'अर्थशिल्प' नावाचं एक मासिक चिंचवड येथून ते प्रकाशित करत असत. भोसरी लायन्स क्लबचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी बराच काळ काम केलं आहे.